**इ.सी.ए. क्र. ०२/२०१९**

**निशाणी क्र. यु-५ वरील आदेश**

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी व्यवहार संहितेच्या आदेश ६ नियम १७ अन्वये अर्जात दुरुस्ती करण्यासाठी दिला आहे.

२. अर्जदाराच्या अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

त्याने प्रस्तुतचा अर्ज हा गैरअर्जदाराविरूद्ध कर्मचारी नूकसान भरपाई कायदा, १९२३ च्या कलम २२ प्रमाणे नुकसान भरपाई मिळण्यासाठी दाखल केला आहे. परंतु अर्ज म्हणणे याकरीता प्रलंबित असतांना विमा कंपनीला पक्षकार करायचे राहून गेल्याचे लक्षात आले. त्यामुळे त्याने विमा कंपनीला पक्षकार म्हणून समाविष्ट करण्याची परवानगी द्यावी अशी विनंती केली.

३. सदरील अर्जावर गैरअर्जदाराचे म्हणणे मागविण्यात आले. गैरअर्जदाराने त्याच अर्जावर म्हणणे दाखल करून अर्जास आक्षेप घेतला आहे.

४. दोन्ही विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अर्जाच्या व म्हणण्याच्या अनुषंगाने अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसते की, अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज हा गैरअर्जदाराविरूद्ध कर्मचारी नूकसान भरपाई कायदा, १९२३ च्या कलम २२ प्रमाणे नुकसान भरपाई मिळण्यासाठी दाखल केला आहे. परंतु अर्ज म्हणणे याकरीता प्रलंबित असतांना विमा कंपनीला पक्षकार करायचे राहून गेल्याचे लक्षात आल्यामुळे तो त्या अनुषंगाने ती बाब अर्जात नमुद करून दुरूस्ती करू इच्छितो.

५. दुरूस्ती अर्जाच्या अनुषंगाने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ चे अवलोकन केले असता त्यामध्ये स्पष्टपणे नमुद केले आहे की, दाव्यात/मुळ अर्जात किंवा लेखी कैफियतीमध्ये दाव्यात पुरावा सुरू होण्यापुर्वी दुरूस्ती करता येईल. प्रस्तुतचा अर्ज हा म्हणणे येण्याकरीता प्रलंबित असल्यामुळे अर्जदाराला दुरूस्ती करता येईल.

६. अर्जदाराने मागितलेली दुरूस्ती विचारात घेता तो करू इच्छित असलेल्या दुरूस्तीमुळे अर्जाच्या मुळ स्वरूपात कोणताही बदल होत नाही. त्यामुळे, प्रस्तुतचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. म्हणुन, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जात नमुद केल्याप्रमाणे अर्जदार अर्जात करू इच्छित असलेली दुरूस्ती त्याने आदेश झाल्यापासुन १४ दिवसांच्या आत करावी व दुरूस्त अर्जाची प्रत अभिलेखावर दाखल करून ती गैरअर्जदाराला देखिल पुरवावी.

भंडारा.
दिनांक : ०७.०९.२०१९.

(सौ. रोहिणी सुहास भोसले-नरसाळे)
आयुक्त,
अंतर्गत : कर्मचारी नूकसान भरपाई कायदा, १९२३
न्यायाधीश : कामगार न्यायालय, भंडारा.